* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

दिनांक :- १२/०३/२०१९

**लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने वाशिम जिल्हयातील निगराणी बदमाश व हिस्ट्रीशिटर यांचे समपुदेशन.**

मा. पोलीस अधिक्षक श्री.वसंत परदेशी यांनी पोलीस अधिक्षक पदाचा स्विकारताच कारवायांचा धडाका सुरु करुन आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुका २०१९ मध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये यासाठी संपुर्ण जिल्हयामध्ये विशेष मोहिम हाती घेतली. त्याचाच एक भाग म्हणुन दिनांक १२/०३/२०१९ चे सकाळी १०.०० वाजता जुने पोलीस मुख्यालय येथे वाशिम जिल्हयातील सर्व निगराणी बदमाश व हिस्ट्रीशिटर यांची मा. अपर पोलीस अधिक्षक विजयकुमार चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये रेकॉर्डवरील एकुण ८९ गुन्हेगार हजर होते. निवडणुकी दरम्यान त्यांचे हातुन कोणताही अनुचित प्रकार घडुन आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याबाबत मार्गदर्शन केले. तसेच जर कोणी काही अनुचित प्रकार केल्यास त्यांचेविरुध्द कडक करण्यात येईल अशी समज सुध्दा दिली.

सदर बैठकीस मा. अपर पोलीस अधिक्षक विजयकुमार चव्हाण, सहाय्यक पोलीस अधिक्षक डॉ.पवन बनसोड, मंगरुळपीर व कारंजा उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती नंदा पराजे, श्री. रमेश सोनुने, परि. पोलीस उप अधिक्षक सुनिल पाटील,पोलीस निरिक्षक शिवा ठाकरे स्थागुशा हे उपस्थित होते.

Sthakare 12/3/19

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम